REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.2331(UIF)
VOLUME - 7 | ISSUE - 4 | JANUARY - 2018

# पेशवेकालीन लोकरंजनाची साधने

डॉ.तुकाराम नारायण शिंदे
इतिहास विभाग , अे.आर.बुर्ला महिला महाविदयालय,सोलापूर.

**प्रस्तावना :**

मानवी जीवनाचा विचार करता मानवाने प्राचीन काळापासून वेगवेगळया प्रकारच्या साधनांचा मनोरंजनासाठी उपयोग केला आहे हे दिसून येते.महाराष्ट्रातील पेशवाईचा विचार करता येथील लोकांनी मनोरंजनासाठी तमाशा, पोवाडे, ललित, दशावतार, नाटक इ.चा मनोरंजनासाठी उपयोग केला होता हे दिसून येते.अशा पेशवेकालीन लोकरंजनाच्या साधनांची माहिती प्रस्तुत शोधनिंबधातून मांडली आहे.



**तमाशा**

तमाशा हा अरबी शब्द असून त्यातून करमणुकीची निरनिराळी साधने असा अर्थ प्रतीत होतो. तमाशात लौकिक करमणूक करणारे शाहीर असत. मूळ शाहीर हा शब्द 'शाइर'या अरबी शब्दाचा मराठी अवतार आहे. त्याचा अर्थ कवी होत असला तरी त्या दडलेला अर्थ लोककवी असा आहे.[१] शाहू महाराज यांची मोगलांच्या कैदेतून सुटका झाल्यानंतर इ.स.१७०८ मध्ये ते मराठयांचे छत्रपती झाले. त्यानंतर त्यांनी भारताच्या निरनिराळया प्रदेशातून गायक,नट आणि नायकिणींना महाराष्ट्रात आणण्याचा प्रयत्न केला. महाराष्ट्रतूनही कुणबी मुलींना नृत्य-गायन शिकवून तरबेज करण्याचा प्रयत्न केला पण यश आले नाही.[२] पेशवे काळाच्या आधीपासून भटक्या जातीपैकी कोल्हाटी जातीच्या स्त्रिया महाराष्ट्रात लोकरंजन करीत होत्या. गावातील जत्रेच्या प्रसंगी त्यांची पाले (छोटया राहुटया) नित्याच्या असत.[३] यातूनच तमाशाची सुरुवात झाली असे मत ग्राहय धरण्यात आले आहे.[४]

पेशवेकालीन तमाशाला 'ढोलकीचा 'तमाशा म्हणत.या तमाशाचा संच किंवा फड असा असे-:
१.पुढारी किंवा सरदार २. ढोलक्या ३. कडे वाजविणारा ४. सोंगाडया ५. २ ते ४ सुरत्ये/ शिलकारी जीजी इत्यादी सूर ओढणारे ६. गोड आवाजाचा एक सुस्वरुप नाचा [५]

**पोवाडा**

पोवाडा हा वीररसयुक्त असून या काव्याच्या सादरीकरणामार्फत शाहीर तत्कालीन वीरपुरुषांच्या रणांगणावरील मर्दुमकीच्या कथा लोकांपुढे मांडत. त्यावेळी त्याचे सादरीकरण केवळ काव्यपठण असे न राहता काव्याचे नाटयदर्शन असेही होई.हॅरी ॲक्वर्थच्या मते, खरा पोवाडा हे लिखित काव्य नाही. महाराष्ट्रातील गोंधळी या फिरत्या स्तुतीपाठकांचे ते वीररसयुक्त गाणे असून एका पिढीपासून दुसऱ्या पिढीपर्यंत पोहचविले जात असे.[६] शाहीर अग्नीदास किंवा अज्ञानदास व तुलसीदास हे शिवकालीन होते. या शाहिरांचे पोवाडे पेशवेकाळातही प्रचलित होते. इ.स.१७६१ च्या तिसऱ्या पानिपत लढाईवर लिहिल्या गेलेल्या७-८ पोवाडयापैकी जंगबहादूर असे शीर्षक असलेला उर्दू पोवाडा सर्वात जुना आहे. कादर नावाच्या शाहिराने तो लिहिला.[७] तर नारायणरावांच्या खूनाच्या प्रसंगावरील पोवाडा लहरी मुकुंदा यांचा आहे.

**भवाई**

स्थानिक गायक किंवा कलाकाराखेरीज पेशव्यांनी उत्तरेकडूनही कलाकार आणल्याच्या नोंदी मिळतात. गुजरात,राजस्थान,बुंदेलखंड येथे प्रचलित असलेल्या लोकनाटय प्रकारापैकी 'भवाई'हा प्रकार पेशवाईत महाराष्ट्रात प्रचलित झाला होता. हा प्रकार तात्पुरत्या राहुटया उभारुन सादर केला जाई. त्यातील नर्मविनोदामुळे,उपरोधामुळे गंमत येत असे. भवाई हा प्रकार मैदानात

जत्रेच्या वेळी लोकरंजनासाठी जरी सादर होत असला तरी पेशवे या कलाकारांना खास वाडयात बोलावून त्यांच्याकडून खेळ करवून घेत.[८]

याशिवाय उत्कृष्ट गायक पुण्यामध्ये आणवून घेण्याचीही हौस पेशव्यांमध्ये होती. इ.स.१७४०-४१ मध्ये नानासाहेब पेशव्यांनी असा आदेश दिला होता. की,पाच-सात हजार रुपये खर्च झाला तरी चालेल पण उत्तरेतून गाणारे ताफे आणले पाहिजेत. त्यानुसार दिल्लीहून दोन गाणारे ताफे आणण्यात आले होते.[९]

## नृत्य

गायनाबरोबर नृत्य करणाऱ्या कलावंतिणी पेशवेकाळाचे खास वैशिष्टये होते. त्यांनी केलेल्या नृत्यातूनही लोकरंजन होत असे. शाहू महाराजांनी उत्तर भारतात आणि कर्नाटकात जाणाऱ्या आपल्या पेशव्यांना नर्तक,नर्तकी आणण्याच्या सूचना दिल्या होत्या.[१०]

पहिला बाजीराव यास बुन्देलखंडाचा राजा छत्रसाल बुंदेला याच्याकडून इ.स.१७२९ मध्ये मस्तानी भेट मिळाली होती. तारीख - मुहम्मदशाहीतील वर्णनानुसार ती कंचनी असून संगीत,नृत्य,घोडेस्वारी आणि तलवार चालविणे यात प्रवीण होती.[११] मराठयांनी महाराष्ट्राच्या सीमा ओलांडून उत्तरेस मोहिमा सुरु केल्या. त्याकाळात नानासाहेब पेशव्यांचा धाकटा बंधू रघुनाथरावही उत्तरेकडील मोहिमांचे नेतृत्व करु लागला. तो अतिशय रसिक होता. रघुनाथरावाने उत्तरेकडील अनेक नर्तकींना पुण्यात आणून ठेवले. त्यांना सरकारी खजिन्यातून पगार देण्यात येई. त्यांचा मासिक पगार याप्रमाणे होता. केशरी चपलेची आई ४५ रुपये,बसंतीची आई-४५ रुपये, यमनी -३० रुपये,गहिना-३० रुपये ,उमेदा -६ रुपये.[१२] पेशवा सवाई माधरावांच्या काळात नाच-गाण्याची परंपरा आणखी वाढली. पेशवा दुसरा बाजीराव यांच्या कारकिर्दीत वेंकट नरसी आणि धर्मी पारी या आणखी दोन उत्कृष्ट नर्तकी होत्य. इ.स.१८०२ मध्ये पेशवा दुसरा बाजीरावाने वेंकट नरसी हिला सतत तीन रात्री नृत्य केल्याबद्दल २६००० रुपये बक्षीस दिल्याची ऐतिहासिक नोंद सापडते.[१३] पेशवेकाळात गणेशोत्सव,होलिकात्सुव,रंगोत्सव या सार्वजनिक समारंभ प्रसंगी लोकरंजनासाठी नृत्याचे आयोजन केले जात असे. याशिवाय खास नृत्ये करणाऱ्या नृत्यांगना केवळ पेशव्यांच्या आणि त्यांच्या कारभाऱ्यांच्या करमणूकीसाठी असत.[१४]

## ललित

‘सोंगे आणून केलेले किर्तन’ असे ललित या करमणूकीच्या साधनाचे स्पष्टीकरण केले जाते. ललितचा मूळ उद्देश उपदेश करणे असा असे तो करमणूकीतून सांगितला जाई. ललित प्रकार सादर करणारे कलावंत शाहिरासारखे गावोगावी फिरत असत. त्यांच्या भाषेवर उर्दू फारशीचा प्रभाव दिसतो. मध्यरात्री सुरु होणारा हा खेळ पहाटेच्या पहिल्या प्रहरापर्यंत चालत असे.[१५] यातून चांगलेच लोकरंजन होत असे.

## भारुड

भारुड हे लोकरंजनाचे साधन संत एकनाथकाळाच्या आधीपासून महाराष्ट्रात अस्तित्वात आहे. भारुड हा नाटयाचा प्रकार होता. त्यामधील पात्रे नाटयाभिनय करीत असत. उत्तर मराठेशाहीतही भारुड हा लोकरंजनाचा प्रकार प्रचलित होता. गावामधील जत्रा किंवा सण समारंभाच्या वेळी ललितबरोबर भारुड हे लोकरंजनाचे प्रकार होत असत.पेशवाई संपल्यावरही भारुडाची लोकप्रियत टिकून होती. एवढेच नव्हे तर पुढे १९ व्या शतकात मराठी नाटकास सुरुवात झाली ती भारुडाच्या बैठकीवर असे मत ग्राहय धरण्यात आले आहे.[१६]

## दशावतार

पेशवेकाळात दशावतार हे लोकरंजनाचे आणखी एक साधन होते. देवळी जातीतील लोक दशावतार खेळ सादर करीत होते. त्यांना दशंत्री किंवा खेळये असे म्हटले जाई. दशावताराचा खेळ देवळात होत असे. इ.स.१७२६ मध्ये फकीरजी आंग्रे यांच्या लग्नात श्यामजी नाईक काळे या दशावताराचा खेळ करणाऱ्यास आंग्रे दरबारात खास पाचारण केले होते.[१७] विशेषतः होळी, रंगपंचमी याकाळात करमणूकीचे जे प्रकार पेशव्यासाठी होत असत त्यामध्ये दशावताराचा समावेश असे.[१८]

## नाटक

मराठी नाटकांची परंपरा इ.स.१८४३ मध्ये विष्णूदास भावे या नाटककारापासून आणि दिग्दर्शकापासून सुरु झाली असे मानले जाते. पेशवेकाळात नाटक सादर होत नव्हते अशी धारणा होती.परंतु अलिकडेच प्रकाशात आलेल्या माहितीनुसार पुण्याच्या त्रिविक्रमाभट या नाटककाराने पञ्चायुधप्रपञ्च नावाचा संस्कृत नाटकाचा ‘भाण’ हा प्रकार पेशवाईच्या काळात लिहिला होता. त्याचा रचनाकाळ इ.स.१८०५ हा होता. पुण्याची विलासीवृत्ती,सुखलोलुपता, कलावंतिणी,विवाहित स्त्री,पुरुषांची छुप्यामार्गाने इतरांशी संबंध ठेवण्यासाठी केलेल्या युक्त्या इत्यादीचे वर्णन या भागात येते.प्राचीन काळापासून भाण हा संस्कृत साहित्यात आढळणारा एकपात्री प्रयोगाच्या प्रकार असून त्यामध्ये प्रामुख्याने शृंगार रस दिसतो.[१९]

पेशव्यांनी आपल्या काळात विलासी जीवनाचा स्वीकार केला होता. त्यासाठी त्यांनी निरनिराळया कलाकारांना आणि कलावंतिणींना आश्रय दिला. यामुळे पेशव्याकडून महाराष्ट्रात संगीत गायन याबाबत प्रगती घडून येण्याचा प्रयत्न झाला. महाराष्ट्राच्या इतर प्रदेशाशी सांस्कृतिक संबंध प्रस्थापित झाले आणि महत्वाचे म्हणजे लोकांना मनोरंजनाची विविध साधने उपलब्ध झाली.

## संदर्भ व तळटिपा

१. य.न. केळकर,मराठी शाहीर आणि शाहिरी वाङःमय ,पुणे विदयापीठ प्रकाशन,पुणे १९७४ पृष्ठ ०१
२. वा.कृ.भावे,पेशवेकालीन महाराष्ट्र,आनंद मुद्रण मंदिर,पुणे.१९३५ पृ.१४०
३. नामदेव व्हटकर,मराठीची लोककला,तमाशा ,चंद्रकांत शेटे प्रकाशन,कोल्हापूर प्रथमावृत्ती १९५९ पृ.४०
४. वि.कृ.जोशी लोकनाटय परंपरा,ठोकळ प्रकाशन ,पुणे,प्रथमावृत्ती,१९६१,पृ.१२२
५. वि.कृ.जोशी,तत्रैव पृ.९१-९३
६. वि.कृ.जोशी, तत्रैव पृ.१२२
७. वि.ल.भावे, महाराष्ट्र सारस्वत, विश्वकर्मा मुद्रणालय,पुणे ४थी आवृत्ती ,१९५४ पृ.७१२-१९
८. शं.तु.शाळीग्राम(संपादक -संग्राहक) होनाजी बाळकृत लावण्या, प्रस्तावना-य.न. केळकर,चित्रशाळा प्रेस प्रकाशन,पुणे पाचवी आवृत्ती,१९७२ पृ.०९
९. गो.स. सरदेसाई,पेशवे दप्तरातून निवडलेले कागद,खंड-१८ गव्हर्नमेंट प्रेस,मुबई १९३१ क्र.६३,पृ.६७
१०. वर्षा शिरगावकर,पेशव्यांचे विलासी जीवन, कॉन्टिमेंटल प्रकाशन,पुणे,२००१ पृ.६४
११. गो.स. सरदेसाई न्यू हिस्ट्री ऑफ दि मराठाज,खंड-२(१७०७-१७७२) फिनिक्स प्रकाशन,मुंबई,१९६८ पृ.१८७-७९
१२. य.न. केळकर, इतिहासातील सहली, खंड दुसरा, चित्रशाळा प्रेस,पुणे प्रथमावृत्ती,१९६४,पृ.१०८
१३. वा.वा. खरे,(संकलित)ऐतिहासिक लेख संग्रह य.वा.खरे(संपादक,),भाग १३,मिरज, १९२६,पृ.६८९६
१४. वर्षा शिरगावकर,तत्रैव,पृ.६६-६७
१५. वर्षा शिरगावकर,तत्रैव,पृ.६७
१६. कृ.वा. मराठे मराठी रंगभूमीचा पूर्वरंग,श्रीविदया प्रकाशन,प्रथमावृत्ती,१९७९,पृ.५९
१७. सुधा देसाई,सोशल लाईफ अंडर दि पेशवाज,पॉप्युलर प्रकाशन,मुंबई प्रथम प्रकाशन,१९८०,पृ.१३७
१८. वर्षा शिरगावकर,तत्रैव,पृ.६३
१९. वर्षा शिरगावकर,तत्रैव,पृ.६८-६९